# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०२/२०१८

**१) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून लाकडी काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०२/०२/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी महेश दिलीप कुभंलावर वय ३० वर्ष रा. केसलवाडा रोड संकल्प नगर केसलवाडा भंडारा हा त्याची स्कुल बस घेवुन परत येत असतांना आरोपी याने स्कुल बस थांबवुन फिर्यादीस तु माझ्या घरा समोरील रोडवरील माती वरून आपली स्कुल बस का नेली? असे म्हणुन भांडण करून हातातील लाकडी काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा कलम ३२४,४४१ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) अंकाऊट वरून पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/०१/२०१८ ते २९/०१/२०१८ पावेतो यातील आरोपीने त्याचे मोबाईल वरून क्लब फॅक्ट्रीचे कस्टमर केअर मधुन बोलतो असे भासवुन ऑनलाईन खरेदी केलेले ऑर्डर रद्द करण्याकरीता बॅक खात्याचे डिटेल घेवुन तसेच ओ.टी.पी. घेवुन त्याचा अप्रमाणीक पणे वापर करून फिर्यादीचे ३५,०००/रु. तसेच फिर्यादीची सहकारी यांचे बॅक ऑफ इंडीयाचे अकाऊंट वरून १०,०००/रु. असे एकुन ४५,०००/रु. काढुन फसवणुक केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(क)(ड) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. सिडाम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) संगनमत करून मारपीट करून गाडीचे नुकशान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०२/०२/२०१८ चे २२.०० वाजता. दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीची ओमनी गाडी क्र. एमएच ३६ एच ७८५५ समोर मागेहुन एव्हेंजर मोटार सायकल क्र. एमएच ३६ /यु ८६९४, पल्सर मोटार सायकल क्र. एमएच ३६ ई ८५४२ चे आरोपी चालकांनी अडवुन त्यास गाडीचे बाहेर ओढुन थापड—बुक्यांनी मारपीट, शिवीगाळ करून गाडीचे साईड मिरर तोडफोड केल्याने फिर्यादी दिलीप केशव भोंदे वय २९ वर्ष रा. नेहरू वार्ड भंडारा याचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,३२३,५०४,४२७,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलच्या धडकेत सायकलस्वार मुलगी जखमी. :—**

दिनांक ०१/०२/२०१८ चे १८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीची मुलगी कु. राणी वय १३ वर्ष ही रोडवरून सायकलने घरी जात असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मुलीच्या सायकलला समोरून धडक दिल्याने, ति सायकलसह खाली पडुन तिचे डावे पायाचे पोटरी जवळ मार लागुन फॅक्चर झाल्याचे डॉ. आकरे भंडारा यांचे एमएलसी रिपोर्ट वरून व फिर्यादी सुधीर गुलाब मोहरकर वय ४२ वर्ष रा. खमारी बु. यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १३४,१८७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) निष्काळजीपणे वाहन चालवुन मुलीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०१/०२/२०१८ चे १२.१५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही नर्सिग टोला येथुन डांबरी रोडने पायी जात असतांना यातील आरोपी चालकाने, त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी ९४१५ ला धडक मारल्याने मोटार सायकल ही फिर्यादीचे आंगावर येवुन तिचे उजवे पायाला, डोक्याला, छातीला दुखापत झाल्याने, फिर्यादी कु. देवांगना हेमराज आदमने वय २१ वर्ष रा. नर्सिगटोला हिचे बयाण तसेच आरोपी चालकाने मद्यप्राशन केल्याने वैद्यकिय अहवाला वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३३७ भादवी.सहकलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) चारचाकी वाहनाच्या धडकेत सायकलस्वार मुलगी गंभिर जखमी झाल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २४/०२/२०१८ चे ०६.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीची बहिन आरती वय १९ वर्ष हिचे सायकलला धडक मारून गभिंर जखमी केल्याने फिर्यादी मिथुन गणेश झंजाळ वय २२ वर्ष रा. परसवाडा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोवि. कळबे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**७) ट्रकच्या धडकेत दोन जखमी . :–**

दिनांक ०२/०२/२०१८ चे १९.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी दुर्योधन निलकंठ तिरपुडे वय ३६ वर्ष रा. सिरसाडा हा व गावकरी वामन महादेव कांबळे दोन्ही रा. सिरसाडा हे दोघेही कामा वरून मोटार सायकलचा पेट्रोल सपंल्याने मोटार सायकल ही हातात घेवुन रोडने पायी परत येत असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन मागेहुन बेटाळा येथे धडक मारुन दोघांनाही जखमी करुन पळुन गेल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १३४,१८७,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**८) विष प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक ०१/०२/२०१८ चे ११.०० वाजता. दरम्यान यातील मृतक लिलाधर प्रेमराज खेडीकर वय ४५ वर्ष, रा. बोरगाव याने दिनांक २९/०१/२०१८ ला विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०१/०२/२०१८ ला मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो.शि. कापगते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०२/०२/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही एनएच ३६/३७५२ चा चालकाने खाम तलाव चौक येथे येणारे जानारे लोकांना अडथळा निर्माण होईल व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. गजभिये यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

१०) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :—

दिनांक ०२/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा व साकोली येथे अवैध दारू /जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५ लिटर हातभट्टी दारू किंमती ५००/—रु, ९०० मिली लिटर देशी दारू किमती २५०/रु. तसेच जुगारातुन १२२/रु. असा एकुण कि.८७२ /रु. चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०२/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०८ तीन सिटर वाहनाकरीता १० ईतर वाहनांवरती — ११२ केसेस करण्यात आले आहे.

(एच.एम. रायपुरे)
स.पो.नि. (नियत्रंण कक्ष अधीकारी)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९७०७३२०७९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.